# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद

१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-४११ ००१

Email id :- mscepune@gmail.com

फोन क्रमांक :- ०२०-२६१२३०६६/६७

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/२०२०/2270
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१,
दिनांक :- 19 /०८/२०२०.

प्रति,

मा. व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
सेंट्रल मुंबई, मुंबई

**विषय :- संगणक टायपिंग, जीसीसी प्रमाणपत्र कोर्ससाठी प्रविष्ठ होणाऱ्या उमेदवाराना एस.टी. वाहतुकीची सवलत मिळणेबाबत.**

**संदर्भ :- महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे जा.क्र.२१९०, दि.१०/०८/२०२० रोजीचे पत्र.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे यांचेमार्फत शासनमान्य संगणक टायपिंग, वाणिज्य प्रमाणपत्र टंकलेखन व लघुलेखन या कोर्ससाठी महाराष्ट्रातील मान्यता प्राप्त खाजगी संस्थांमार्फत प्रशिक्षण देण्यात येते.

या कोर्ससाठी दरवर्षी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून किमान एकूण ३ ते ३.५ लाख उमेदवार प्रवेशित असतात. काही उमेदवार ग्रामीण भागातून तालुका अथवा जिल्हास्तरावर संस्थेत प्रशिक्षणासाठी येतात. या उमेदवारांना सदर प्रशिक्षणासाठी संस्थेपर्यंत ये-जा करण्यासाठी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सर्वसाधारणपणे शालेय विद्यार्थ्यांसाठी असलेली एस.टी.महामंडळाची सवलतीच्या दरातील पास व्यवस्था मिळावी ही अपेक्षा आहे. तसे आपल्या सर्व आगार प्रमुखांना आपल्या स्तरावरून कळवावे व संदर्भिय पत्र रद्द समजण्यात यावे, हि विनंती.

(तुकाराम सुपे)
अध्यक्ष
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-१**

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव सादरः-

१. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व)
३. आगार प्रमुख (सर्व), महाराष्ट्र राज्य परिवहन विभाग प्रमुख/आगार प्रमुख यांना उचीत कार्यवाहीस्तव.
४. संस्थाचालक/प्राचार्य (सर्व)

Desktop/GUNJAL SIR TYPING DOC 2652020